# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२०

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे-**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२० व सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२० रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(क) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**सहकार मंत्री** : "**आसुर्ले-पोर्ले (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील दत्त सहकार साखर कारखान्याची अवसायक असतानाही विक्री केल्याबाबत**" या विषयावर डॉ.सुजित मिणचेकर, विधानसभा सदस्य यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ५८४१४ ला दिनांक २७ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **वित्त विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(२) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **सार्वजनिक बांधकाम विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष

खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **सार्वजनिक आरोग्य विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(५) अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री** : (क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **अल्पसंख्याक विकास विभागाचे** सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) सुधारित विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **अल्पसंख्याक विकास विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(६) इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य

प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(७) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(८) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** :

(क) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ग) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(९) **कृषि मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(१०) **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास

मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(११) आदिवासी विकास मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **आदिवासी विकास विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(१२) परिवहन मंत्री**

(क) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(१३) महिला व बाल विकास मंत्री** :

(क) महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०१८-२०१९ या वर्षांचा चव्वेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील खंड ८ अन्वये **महिला व बाल विकास विभागाचे** सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षातील वैधानिक विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(१४) पर्यावरण मंत्री** : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**पाच : शासकीय विधेयक :**

**पुर:स्थापनार्थ, विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २९ –महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, २०२०.

**(बुधवार, दिनांक ११ मार्च, २०२० रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सहा : सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, ॲड.आशिष शेलार, श्री.राजेंद्र पाटणी, डॉ.संजय कुटे, सर्वश्री राम कदम, राधाकृष्ण विखे-पाटील, गणेश नाईक, ॲड.आकाश फुंडकर, सर्वश्री हरिभाऊ बागडे, प्रशांत बंब, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री संजय केळकर, अतुल भातखळकर, सुनील राणे, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.योगेश सागर, डॉ. भारती लव्हेकर, ॲड.पराग अळवणी, श्री.अमित साटम, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड राहुल कुल, श्री. संभाजी पाटील-निलंगेकर, डॉ.राहुल आहेर, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, संतोष दानवे, राणा जगजितसिंग पाटील, अभिमन्यु पवार, रणधीर सावरकर, सुभाष देशमुख, जयकुमार रावल, बबनराव लोणीकर, गिरीष महाजन, नितेश राणे, जयकुमार गोरे, शिवेंद्रसिंह भोसले, बबनराव पाचपुते, सुरेश भोळे, रविंद्र चव्हाण, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.अतुल सावे, श्रीमती मोनिका राजळे, श्री.समीर कुणावार, डॉ.पंकज भोयर, श्री हरिष पिंपळे, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री विजयकुमार गावित, संजय सावकारे, श्रीमती श्वेता महाले, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री.राम सातपुते, श्रीमती नमिता मुंदडा, डॉ.सुरेश खाडे, श्री.कालिदास कोळंबकर, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री. संजीवरेड्डी बोदकुरवार, प्रा.डॉ.अशोक उईके वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये धार्मिक अल्पसंख्याकांचा अपरिमित छळ होणे, त्याचाच परिणाम म्हणून अनेक हिंदू, बौध्द, जैन, शीख, खिश्चन इत्यादी नागरिक आश्रय घेण्यासाठी भारतामध्ये येणे, या छळ झालेल्या नागरिकांना नागरिकत्व देण्यासाठी भारतीय संसदेने सुधारीत नागरिकत्व सुधारणा कायदा संमत करणे, नागरिकत्व हा केंद्रसुचीतील विषय असल्याने त्याबाबत कायदा करण्याचा पूर्ण अधिकार संसदेस असणे, संसदेने केलेला कायदा संपूर्ण भारतभर म्हणजेच महाराष्ट्रातही लागू असणे, हा कायदा नागरिकत्व काढून घेणारा नसून नागरिकत्व देणारा असणे, या कायद्यामुळे अल्पसंख्याक समुदायाचे कोणतेही अधिकार हिरावून घेतले जाणार नसणे, तरीदेखील काही देशविघातक शक्ती या कायद्याबाबत संभ्रम पसरविण्यात अग्रेसर असणे, या कायद्याबाबत अफवा पसरविणाऱ्या अनेक खोट्या चित्रफिती, संदेश, समाज माध्यमांमध्ये फिरत असणे, अफवांचे पीक जोरात असल्याने भारतीय समाज मनामध्ये दुही पाडण्याची जी बाब पाकिस्तानलाही जमली नाही ती बाब काही देशविघातक शक्तींनी घडवून आणणे, या अफवा पसरविणाऱ्या व्यक्तींवर कायद्यातील कलमाप्रमाणे कारवाई करण्याची आवश्यकता असणे, राष्ट्रीय नागरिक नोंदणी (**NRC**) बाबत तर कोणतीही चर्चा झालेली नसल्याने व त्याची अंमलबजावणी आसामव्यतिरिक्त

इतरत्र होणार नसल्याचे केंद्र शासनाने स्पष्ट केलेले असतानासुध्दा त्याविरुध्दही हेतूपूर्वक अपप्रचार करण्यात येणे, या अपप्रचाराला आळा घालून नागरिकत्व कायद्याविषयी सकारात्मक संदेश सर्वदूर जाणे आवश्यक असणे, त्यादृष्टीने पाकिस्तान, बांग्लादेश व अफगाणिस्तान मधील धार्मिक अल्पसंख्याक असणाऱ्या व प्रचंड छळ झालेल्या आश्रितांना नागरिकत्व देण्यासाठी महाराष्ट्र विधीमंडळाने त्वरित सुधारीत नागरिकत्व कायद्याला पाठिंबा देणारा ठराव करण्याची आवश्यकता असणे, नॅशनल पॉप्युलेशन रजिष्टर (**NPR**) चे काम लवकरात लवकर राज्यामध्ये सुरु होऊन ते पूर्णत्वास जाणे गरजेचे असणे, भारतीय समाज मनामध्ये विशेषत: महाराष्ट्रामध्ये काही समुदायामध्ये पसरलेल्या अफवा दूर करुन संशयाचे धुके कमी करण्यासाठी तातडीने विधिमंडळात चर्चा होण्याची आवश्यकता, परंतु याबाबतीत शासनाकडून पुढाकार न घेतल्याने महाराष्ट्रातील कोट्यवधी नागरिकांमध्ये तीव्र स्वरुपाचा असंतोष पसरला असणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

**सात** : **सर्वश्री देवेंद्र फडणवीस**, **चंद्रकांत (दादा) पाटील**, **सुधीर मुनगंटीवार**, **ॲड आशिष शेलार**, **सर्वश्री मंगलप्रभात लोढा**, **राजेंद्र पाटणी**, **हरिभाऊ बागडे**, **गणेश नाईक**, **राधाकृष्ण विखे-पाटील**, **संभाजी पाटील निलंगेकर**, **किसन कथोरे**, **राणाजगजितसिंग पाटील**, **नितेश राणे**, **सर्वश्रीमती माधुरी मिसाळ**, **मंदा म्हात्रे**, **सर्वश्री बबनराव पाचपुते**, **महेश लांडगे**, **कालिदास कोळंबकर**, **अतुल भातखळकर**, **योगेश सागर**, **रणधीर सावरकर**, **डॉ. राहुल आहेर**, **श्रीमती सीमा हिरे**, **सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर**, **डॉ.संजय कुटे**, **सर्वश्री. समीर कुणावार**, **जयकुमार रावल**, **ॲड आकाश फुंडकर**, **सर्वश्री संजय सावकारे**, **प्रशांत बंब**, **राजेश पवार**, **मोहन मते**, **वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी गत शासनाने महाराष्ट्रामध्ये ८१ आंतरराष्ट्रीय शाळा सुरु करण्यात येणे, या सर्व शाळा नव्याने सुरु न करता जिल्हा परिषदेमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शाळांनाच आंतरराष्ट्रीय शाळांचा दर्जा देण्यात येणे, गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी या शाळा शिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरत असल्यामुळे या सर्व शाळांना खुप चांगला प्रतिसाद मिळत असणे, बहुतांश शाळांमध्ये प्रवेशासाठी शेकडो विद्यार्थी प्रतिक्षा यादीवर असणे, ही सर्व मुले शेतकरी, कष्टकरी, मजूर, आदिवासी व अनुसूचित जातीची असणे, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या शाळांचे कामकाज व्यवस्थित चालावे यासाठी महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ देखील स्थापन करण्यात येणे, परंतू विशिष्ट राजकीय अभिनिवेष मनात ठेवून मा.मंत्री शिक्षण यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ बंद करण्याची घोषणा केल्याने, हजारो विद्यार्थी व त्यांचे पालक यांचेमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, तसेच शालेय पोषण आहार योजनेमध्ये निविदा प्रक्रिया करताना अनेक अनियमितता झाल्याच्या तक्रारी प्राप्त होणे, झालेल्या तक्रारी बघता निविदा प्रक्रिया तातडीने रद्द करण्याची आवश्यकता असणे, २१०० शाळांना अनुदानाचा दुसरा टप्पा देण्याबाबत माहे सप्टेंबर २०१९ मध्येच निर्णय होवूनही त्या संदर्भातील अनुदान अद्याप वितरीत न होणे, परिणामी हजारो शिक्षकांमध्ये असंतोष पसरणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही, घटनेमध्ये धर्माच्या आधारावर आरक्षण देण्यात येवू नये असे स्पष्ट

नमूद केलेले असतानाही मा.मंत्री अल्पसंख्याक यांनी मुस्लिम समाजाला धर्माच्या आधारावर शैक्षणिक आरक्षण देण्याची घोषणा करणे, सदर घोषणा केल्यानंतर सभागृहामध्ये मा.मुख्यमंत्र्यांनी याबाबत आतापर्यंत कोणतीही भूमिका जाहीर न करणे, या घोषणेप्रमाणे मा.ऊर्जामंत्र्यांनी १०० युनिटपर्यंत मोफत वीज देवू अशी घोषणा करणे, परंतू दुसऱ्याच दिवशी मा.वित्तमंत्र्यांनी असा कोणताही निर्णय न झाल्याचे स्पष्ट करणे, २५/१५ या ग्रामविकास विभागाच्या लेखाशिर्षातंर्गत सुरु असलेल्या विविध कामांना स्थगिती देण्यात आली असताना मा.मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली नसून केवळ फेरविचार सुरु आहे असे स्पष्टीकरण सभागृहात देणे, अनेक विषयांवर एकाच शासनाच्या विविध मंत्र्यांनी वेगवेगळे विचार मांडल्याने अनेक धोरणात्मक निर्णय प्रलंबित असणे, शासनाच्या मंत्र्यामध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे अनेक विकासकामांना खिळ बसणे, विकासकामांच्या संथगतीमुळे कोटयवधी नागरिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ११ मार्च, २०२०

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा